In Short

दोन अतिरेक्यांना अटक, शस्त्रे जप्त

इम्फाळ : मणिपूरमधील तेंग्नौपाल जिल्ह्यात कुख्यात प्रतिबंधित 'पीपुल्स लिबरेशन आर्मी'च्या (पीएलए) दोन अतिरेक्यांना पोलिसांनी रविवारी अटक केली. एन. प्रियो सिंह (२१) व एस. देवजीत सिंह (२१) अशी त्यांची नावे आहेत. आसाम रायफल्सच्या एका तुकडीने सीमावर्ती भागात टेहळणी केली. यावेळी गुप्त कारवाया करताना दिसून आल्याच्या संशयावरून त्यांनी पीएलएच्या दोन कार्यकर्त्यांच्या मुस्क्या आवळल्या असून त्याच्याकडील शस्त्र जप्त करण्यात आले आहेत. पुढील कारवाईसाठी या दोघांनाही राज्य पोलिसांच्या स्वाधीन केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले, दरम्यान, 'पीपुल्स रिव्होल्युशनरी पार्टी ऑफ कांगलीपाक' (पीआरईपीएके) च्या एका अतिरेक्याला भारत-म्यानमार सीमेवर गेल्या शुक्रवारी अटक करण्यात आली होती.

मेक्सिकोत रस्ते अपघातात २४ जण ठार

मेक्सिको सिटी : मेक्सिकोतील जाकाटेकास प्रांतात बस व ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात २४ जण मरण पावले असून, ५ जण जखमी झाले आहेत, अशी माहिती स्थानिक पोलिसांनी रविवारी दिली आहे. पश्चिमेकडील नायरिट येथून उत्तरेकडील सियुदाद ज्वारेज शहराकडे जाणाऱ्या प्रवासी बसला समोरून येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत बसमधील २४ जण जागीच मरण पावले आहेत. या अपघातानंतर या मार्गावरील सार्वजनिक वाहतूक बंद करण्यात आली, असे अधिकारी म्हणाले. दरम्यान, मेक्सिकोतील खराब रस्ते व जर्जर झालेल्या वाहनांमुळे अपघात होणे नित्याचीच बाब बनली आहे. २०२३ साली देशभरात ३ लाख ८१ हजार अपघात झाले. यात ४,८०० जण मरण पावले असून ९० हजार जण जखमी झाले आहेत.

श्रीलंकेकडून भारताच्या १२ मच्छीमारांना अटक

कोलंबो : श्रीलंकेच्या नौदलाने समुद्रात अवैधरीत्या मासेमारी केल्याच्या आरोपानुसार भारताच्या १२ मच्छीमारांना रविवारी अटक करीत त्यांच्याकडील नौका जप्त केल्या आहेत, अशी माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. भारतीय मच्छीमारांना अटक केल्यानंतर त्यांना कांकेसंथुराई बंदरावर नेण्यात आले. तिथे पुढील कारवाई करून त्यांना मैलाडी मत्स्यनिरीक्षकांकडे सुपुर्द करण्यात आले, असे अधिकारी म्हणाले. दरम्यान, चालू २०२४ या वर्षात श्रीलंकेने अटक केलेल्या भारतीय मच्छीमारांची संख्या ४६२, तसेच जप्त केलेल्या नौकांचा आकडा ६२ झाला आहे.

युवा मनुष्यबळ देशाला कुशल प्रतिभेचे जागतिक केंद्र बनवतेय - मोदी

युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सरकार कटिबद्ध

नवी दिल्ली : विविध क्षेत्रांत सक्रिय योगदान देणारे युवा मनुष्यबळ देशाला कुशल प्रतिभेचे जागतिक केंद्र बनवत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. कौशल्यप्राप्त युवकांची महत्त्वाची भूमिका भारताची सर्वात मोठी ताकद आहे. या युवा व्यावसायिकांच्या कौशल्याच्या जोरावर विकासाला प्रोत्साहन देणे व आत्मनिर्भर भारताचा दृष्टिकोन आणखी मजबूत करण्याची अपार क्षमता असल्याचे मोदींनी नमूद केले.

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयद्वारे (एमएसडीई) आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभ-२०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिखित संदेश पाठवला. आपल्या संदेशात त्यांनी देशभरातील ८ लाखांहून अधिक पदवीधरांना शुभेच्छा दिल्या. कौशल्य निपुणतेविषयी पदवीदधर युवकांच्या त्यागावर प्रकाश टाकत, हा दीक्षांत समारंभ मैलाचा दगड सिद्ध झाल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली. आपल्या लिखित संदेशात पंतप्रधान म्हणतात की, कौशल्य दीक्षांत समारंभ हा केवळ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचा उत्सव नाही. तर त्यांच्या जीवनात एका नव्या अध्यायाची सुरुवात करण्याचा हा सोहळा आहे.

भारताच्या विकासाला प्रोत्साहन देणे व आत्मनिर्भर भारताचा दृष्टिकोन मजबूत करण्याची अपार क्षमता युवा मनुष्यबळात असल्याचे मोदींनी अधोरेखित केले. देशात सेवा देणाऱ्या युवा मनुष्यबळाची निपुणता व त्यांच्या मोठ्या संख्येमुळे आपला देश जागतिक स्तरावर कुशल प्रतिभेचे नवे ऊर्जाकेंद्र म्हणून नावारूपास येत आहे. म्हणूनच युवकांना सशक्त करण्यावर केंद्रित भारत सरकारचे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय नव्या धोरणासह काम करीत आहे. युवा मनुष्यबळाचा भविष्यकाळ आणखी उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जागतिकदृष्ट्या प्रासंगिक असलेल्या कौशल्याचे प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही पंतप्रधानांनी आपल्या संदेशात दिली. प्रशिक्षणाच्या संधी वाढवणे, तंत्रशिक्षण अपग्रेड करणे व मौल्यवान आंतरराष्ट्रीय भागीदारीच्या माध्यमातून भारतातील युवा व्यावसायिकांना जागतिक मनुष्यबळावर स्थायी प्रभाव टाकणे शक्य आहे.

बंगालचे डॉक्टर आता गावोगावी जाऊन निदर्शने करणार

राज्यव्यापी लढा उभारण्याचा डॉक्टरांचा मानस

कोलकाता : पश्चिम बंगालची राजधानी कोलकातास्थित आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या हत्येविरोधात पश्चिम बंगालमधील कनिष्ठ डॉक्टरांचे आंदोलन सुरूच आहे. आता पुढील टप्प्यात राज्यातील गावोगावी जाऊन निदर्शने करण्याचा संकल्प 'पश्चिम बंगाल ज्यूनिअर डॉक्टर्स फ्रंट'ने (डब्ल्यूबीजेडीएफ) रविवारी केला. आपल्या आंदोलनाला खेड्यापाड्यांमधून पाठिंबा मिळवणे व पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी राज्यव्यापी लढा उभारण्याचा या आंदोलक डॉक्टरांचा मानस आहे.

आरजी कर महाविद्यालयातील महिला डॉक्टर हत्येप्रकरणी कनिष्ठ डॉक्टरांनी आपले आंदोलन गावोगावी नेण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत या हत्याकांडाची चौकशी तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचणार नाही किंवा याप्रकरणी मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे. केवळ महानगरे, शहरे व उपनगरापुरते आमचे आंदोलन मर्यादित राहणार नाही. तर आगामी काळात ते दुर्गम व ग्रामीण भागापर्यंत नेण्यात येईल, असे या आंदोलनाचा प्रमुख चेहरा असलेले देवाशीष हलदर यांनी ठणकावून सांगितले. याचवेळी सत्तारूढ तृणमूल काँग्रेसच्या पाठिंब्याच्या जोरावर 'पश्चिम बंगाल ज्युनिअर डॉक्टर्स असोसिएशन' (डब्ल्यूबीजेडीए) नावाने नवी संघटना स्थापन करण्यावर हलदर यांनी तीव्र आक्षेप घेतला. 'धमकी संस्कृती'मधील आरोपी आता राज्यातील सत्तारूढ पक्षाच्या पाठिंब्याने नव्या संघटना बनवून मोठमोठ्या गप्पा मारत आहेत, असा पलटवार हलदर यांनी केला. 'डब्ल्यूबीजेडीए'मधील कनिष्ठ डॉक्टर अनिकेत महतो यांना नुकतीच नोटीस मिळाली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासोबतच्या बैठकीत निलंबित डॉक्टरांना कुख्यात आरोपी संबोधल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. पण, आम्ही 'धमकी संस्कृती'चे शिकार आहोत, असे 'डब्ल्यूबीजेडीए'चे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मात्र, या आरोपांचे खंडन करीत कनिष्ठ डॉक्टरांच्या संघटनेचे नेते देवाशिष हलदर यांनी 'डब्ल्यूबीजेडीए' व राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली आहे.

लखनौ व तिरुपतीतील हॉटेल्स, मंदिरालाही बॉम्बची धमकी

लखनौ : गुजरातनंतर उत्तरप्रदेशची राजधानी लखनौ येथील अनेक हॉटेलांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने रविवारी खळबळ उडाली. यादरम्यान, आंध्रप्रदेशातील तिरुपती येथील अनेक हॉटेलांना व एका मंदिरालाही बॉम्बची धमकी देणारे ई-मेल मिळाले. यामुळे सतर्क झालेल्या पोलीस यंत्रणेने सर्व ठिकाणी कसून झडती घेतली. कुठेही काहीही आक्षेपार्ह न आढळल्याने या धमक्या खोट्या असल्याचे स्पष्ट झाले.

लखनौतील हॉटेल फॉर्च्युन, लेमन ट्री, हॉटेल मॅरियटसह अनेक हॉटेलांमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी रविवारी ई-मेलद्वारे मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांचा फौजफाटा, बॉम्बविरोधी पथक व श्वान पथक या हॉटेलांमध्ये पोहोचले. सर्व ठिकाणी कसून तपासणी केल्यानंतर कुठेही बॉम्ब आढळून आला नाही. अशा प्रकारे खोट्या धमकीचे ई-मेल पाठविणाऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न सुरू केले आहेत. दरम्यान, आंध्रप्रदेशातील तिरुपती येथे रविवारी पुन्हा दोन हॉटेल व वरदराज मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. धमकी देणाऱ्या ई-मेलमध्ये अटकेत असलेल्या द्रमुकच्या एका नेत्याच्या नावाचा तसेच दहशतवादी व पाक गुप्तचर संस्था आयएसआयच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, ही धमकीही खोटी असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले. उल्लेखनीय बाब म्हणजे, देशभरात एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत शाळा, महाविद्यालये, विमानतळांना बॉम्बच्या धमक्या देण्याचे प्रकार सुरू असताना आता हॉटेलांनाही अशा धमक्या देण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. दुसरीकडे तिरुपती येथील हॉटेलांना शुक्रवारी व शनिवारी तर गुजरातमधील किमान १० हॉटेलांना शनिवारी धमकीचे ई-मेल मिळाले होते.

बांगलादेशची घुसखोरी थांबली तरच बंगालमध्ये शांतता – शाह

बंगालची सत्ता मिळाल्यास स्थलांतरितांचे लोंढे रोखू

पेट्रापोल : शेजारच्या बांगलादेशच्या सीमेपलीकडून भारतात होणारी घुसखोरी थांबली तरच पश्चिम बंगालमध्ये शांतता प्रस्थापित केली जाऊ शकेल, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी केले. आगामी २०२६ मध्ये पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजपला सत्ता मिळाली तर बांगलादेशातून येणारे स्थलांतरितांचे लोंढे रोखले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पश्चिम बंगालमधील भारत-बांगलादेश सीमेवरील पेट्रापोल भूमी बंदरावर एक नवे प्रवासी टर्मिनल व भवन व 'मैत्री द्वार'चे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. यावेळी आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या सरकारवर

जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात भूमी बंदरे महत्त्वाची भूमिका बजावत असतात. जेव्हा सीमेपलीकडून वैध वाहतुकीची शक्यता नसते. तेव्हा अवैधरीत्या वाहतूक होण्याचे प्रकार वाढतात. त्याचा परिणाम देशाच्या शांततेवर होत असतो. म्हणून २०२६ साली होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जनतेने राज्यात परिवर्तन घडवावे व राज्याची सत्ता आमच्या हातात द्यावी, असे आवाहन शाह यांनी केले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भ्रष्ट आहे. त्यामुळे २०२६ साली होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसच्या सरकारला जागा दाखवून राज्यातील जनतेने परिवर्तन घडवावे. भाजपला सत्ता मिळाली तर बांगलादेशातून होणारी घुसखोरी खात्रीने रोखली जाईल व राज्यात शांतता प्रस्थापित केली जाईल, अशी ग्वाही अमित शाह यांनी पुढे बोलताना दिली. बांगलादेशातून होणारी घुसखोरी थांबली तरच पश्चिम बंगालमध्ये शांतता नांदू शकते. या घटनाक्रमात भारत-बांगलादेशातील दळणवळण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी भूमी बंदरे अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

भारतीय अंतराळ स्थानकाला प्रक्षेपण केंद्र बनवणार– इस्रो

नवी दिल्ली : भारत लवकरच लँडर तंत्रज्ञानामध्ये प्रभुत्व मिळवणार आहे. इतकेच नाही तर चंद्रावरील पुढील संशोधनासाठी भारतीय अंतराळ स्थानकाला प्रक्षेपण केंद्र बनविण्याची योजना असल्याचे इस्रोचे अध्यक्ष डॉ.एस. सोमनाथ यांनी म्हटले. २०३५ सालापर्यंत भारताचे स्वतंत्र अंतराळस्थानक असेल, असा दावा नुकताच केंद्र सरकारने केला होता.

दिल्लीतील रंगभवनमध्ये आकाशवाणीच्या प्रतिष्ठित सरदार पटेल स्मारक व्याख्यानमालेत बोलताना डॉ. एस. सोमनाथ यांनी भविष्यातील अंतराळ मोहिमांवर प्रकाश टाकला. 'भारतीय अंतराळ यात्रा : नव्या संधीचा शोध' या विषयावर ते बोलत होते. यावेळी त्यांनी भारताच्या 'अंतराळ व्हिजन-२०४७'ची माहिती दिली. भविष्यात चंद्रावर शोध मोहिमा राबविण्यासाठी भारतीय अंतराळ स्थानकाला प्रक्षेपण केंद्र बनविण्याची योजना आहे.

गत १४ दिवसांत ३५० विमानांना बॉम्बची धमकी!

नवी दिल्ली : भारतीय एअरलाइन्सच्या विमानांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमक्या सुरूच असून, रविवारी दिवसभरात किमान ५० विमानांना धमक्या मिळाल्या. यासोबतच गत १४ दिवसांपासून धमक्या मिळालेल्या विमानांची संख्याही ३५० वर पोहोचली. धमक्या देणाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच अशांवर कठोर कारवाईसाठी कायदा दुरुस्तीचाही केंद्र सरकारचा विचार असल्याचे नागरी उड्डयन मंत्री के. आर.नायडू यांनी सांगितले.

सोशल माध्यमांद्वारे रविवारीही १० देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय मार्गावरील विमानांना बॉम्बची धमकी मिळाली. 'अकासा एअर'च्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवसभरात या विमान कंपनीच्या १५ विमानांना धमक्या मिळाल्या. त्यानुसार सुरक्षात्मक उपाययोजना राबवीत विमानांची झडती घेण्यात आली. कोणत्याही विमानात काहीही आक्षेपार्ह नसल्याचे स्पष्ट होताच या विमानांना नियोजित उड्डाणाची परवानगी देण्यात आल्याचे प्रवक्त्यांनी स्पष्ट केले. अशाच प्रकारे इंडिगो एअरलाइन्सच्या १८ विमानांना आणि विस्तारा एअरलाइन्सच्या १७ विमानांनाही रविवारी धमक्या मिळाल्या होत्या. मात्र, तपासणीनंतर धमक्या खोट्या असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

ड्रायव्हिंग स्कूलसाठी नियम बनवण्याचा राज्यांना अधिकार नाही!

प्रयागराज : केंद्रीय मोटर वाहन कायदा-१९८९ च्या कलम २७ नुसार ड्रायव्हिंग स्कूल अर्थातच चालक प्रशिक्षण केंद्रांना परवाना देण्याचा आणि त्यांचे नियमन करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारला आहे. राज्य सरकारला यासंदर्भात नियम करण्याचा कुठलाही अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला. तसेच उत्तरप्रदेश सरकारने गतवर्षी जारी केलेला यासंदर्भातील आदेशही न्यायालयाने रद्द केला.

उत्तरप्रदेश सरकारने २०२३ साली खासगी ड्रायव्हिंग स्कूलसाठी मानक संचालन प्रक्रिया (एसओपी) निर्धारित करत आदेश जारी केला होता.

Public Notice in Form XIII of MOFA (Rule 11(9) (e))
District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4)
Bhandari Co-op. Bank Building, 2nd floor, P. L. Kale Guruji Marg, Dadar (W), Mumbai-400028.

No.DDR-4/Mum./deemed conveyance/Notice/2802/2024 Date: 17/10/2024
Application u/s 11 of Maharashtra Ownership Flats (Regulation of the Promotion of construction, Sale, Management and Transfer) Act, 1963

Public Notice
Application No. 211 of 2024

Pathak Willow CHS Ltd., Having address at CTS No. 430-B/5 of Dahisar, CS Complex Road No. 3, Dahisar (E), Mumbai - 400068 **Applicant, Versus, 1. M/S. Pathak Realtors, Through its Proprietor of Mr. Ajay Ramavatar Pathak**, Having address at Shop No. 4, Bhalchandra Kripa Bldg, Daulat Nagar, Road No. 3, Borivali (E), Mumbai - 400066 **2. Shri. Laxman Sukur Kini, Alias Laxman Sukrya Kini**, Having last known address at CTS No. 1430/B/5, Survey No. 319, Hissa No. 1/A, Survey No. 319, Hissa No. 1/B, Village Dahisar, Taluka Borivali, CS Complex Road No. 3, Dahisar (E), Mumbai - 400068, **3. M/S. Sanjanwala Construction**, Having last known address at CTS No. 1430/B/5, Survey No. 319, Hissa No. 1/A, Survey No. 319, Hissa No. 1/B, Village Dahisar, Taluka Borivali, CS Complex Road No. 3, Dahisar (E), Mumbai - 400068 **4. Additional Collector of Mumbai Suburban**, (ULC) Administrative Building 5th floor, Near Chetna College, Bandra (E), Mumbai - 400051,....**Opponents**, and those, whose interests have been vested in the said property may submit their say at the time of hearing at the venue mentioned above. Failure to submit any say shall be presumed that nobody has any objection in this regard and further action will be taken accordingly.

Description of the Property :-

Claimed Area

Unilateral Conveyance for the Applicant Society for Deemed Conveyance of all that piece and parcel of land & building admeasuring 192.60 square meters (which is as per latest P.R.C. Records) land bearing CTS No. 1430/B/5 corresponding Survey No. 319, Hissa No. 1/A and Survey No. 319, Hissa No. 1/B of Village Dahisar, Taluka Borivali, City Survey Office Borivali of Mumbai Suburban District as per approved plan and the Latest Architect Certificate dated 24/7/24, in favour of the Applicant Society.

The hearing in the above case has been fixed on **28/10/2024 at 02:00 p.m.**

SEAL

Sd/-
District Deputy Registrar,
Co-operative Societies, Mumbai City (4)
Competent Authority
U/s 5A of the MOFA, 1963.

निडो होम फायनान्स लिमिटेड
(यापुढे निडो म्हणून संदर्भित) (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय येथे स्थित : टॉवर ३, पाचवा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०० ०७०

सरफेसी कायदा, २००२ च्या नियम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **निडो होम फायनान्स लिमिटेड (येथून पुढे निडो म्हणून संबोधण्यात येईल) (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)** यांच्याकडून घेतलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल आणि व्याजाची रक्कम अदा करण्यास खालील कर्जदारांनी कसूर केली आणि सदर कर्ज खाती अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आली. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी ॲक्ट) च्या सेक्शन १३ (२) अंतर्गत त्यांना त्यांच्या अंतिम ज्ञात पत्त्यावर मागणी सूचना बजावण्यात आली होती. सदर मागणी सूचनेच्या अतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.
कर्जदार, प्रतिभूती, देय थकबाकी, सेक्शन १३ (२) अंतर्गत पाठविलेली मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेल्या रकमेचा तपशील खाली देण्यात आला आहे :

१. कर्जदार, सहकर्जदार, हमीदारांचे नाव आणि पत्ता आणि कर्ज रक्कम :
राज किशोर राऊल (कर्जदार) (कर्जदार) आणि गीतांजली राऊल – (कर्जदार)
खोली क्र. २०२, श्री गजानन अपार्टमेंट, कृपा चैतन्य स्कूलजवळ, बदलापूर (पूर्व), ठाणे–४२१ ५०३
एलएएन क्र. : एलकेवायएनएसटीएच००००००७१७८१, **कर्ज करार दिनांक :** २८ मार्च २०२१
कर्ज रक्कम : रु. १६,८१,६४८/– (रुपये सोळा लाख एक्क्याऐंशी हजार सहाशे अठ्ठेचाळीस मात्र)
एनपीए दिनांक : ०४–१०–२०२४ **मागणी सूचनेची तारीख :** ०९.१०.२०२४
देय रक्कम : रु. १६,२०,७०५.५८/– (रुपये सोळा लाख वीस हजार सातशे पाच आणि पैसे अठ्ठावन मात्र) ०९.१०.२०२४ दिनांकित मागणी सूचनेच्या तारखेपासून पुढील व्याजासोबत

प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : नोंदणी जिल्हा ठाणे आणि उपजिल्हा उल्हासनगरच्या मर्यादेमध्ये आणि कुळगाव बदलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये, गाव कात्रप, तालुका अंबेमठ, जिल्हा ठाणे येथे स्थित मोजमापित ६६८.९० चौ. मीटर्स क्षेत्रफळाच्या सर्व्हे क्र. ३१, हिस्सा क्र. ४ (भाग), प्लॉट क्र. ६ धारक जमिनीच्या भागावर बांधलेल्या ''गायत्री को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.'' म्हणून ज्ञात इमारतीमधील मोजमापित ६०० चौ. फूट चटई क्षेत्रफळाच्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ९ धारक मालमत्तेचे सर्व अंगीकृत भाग. **चतु:सीमा अशा : उत्तर :** गार्डन, **दक्षिण :** रजिस्ट्रेशन ऑफिस रोड, **पूर्व :** लिटिल मिलेनियम स्कूल, **पश्चिम :** अंतर्गत रस्ता आणि रजिस्ट्रेशन ऑफिस.

२. कर्जदार, सहकर्जदार, हमीदारांचे नाव आणि पत्ता आणि कर्ज रक्कम :
रवि वीरेंद्र जयस्वाल (कर्जदार) आणि सुशीला वीरेंद्र जयस्वाल–(कर्जदार)
शास्त्रीनगर, खोली क्र. २२, गल्ली क्र. ३, ९० फूट रस्ता, आचार्य अत्रे मैदानाच्या जवळ, घाटकोपर पूर्व, मुंबई–४०० ०७५.
एलएएन क्र. : एलकेवायएनएसटीएच००००००६०५१२, **कर्ज करार दिनांक :** २७ सप्टेंबर २०१८
कर्ज रक्कम : रु. २६,३०,९३७/– (रुपये सव्वीस लाख तीस हजार नऊशे सदतीस मात्र)
एनपीए दिनांक : ०४–१०–२०२४ **मागणी सूचनेची तारीख :** ०९.१०.२०२४
देय रक्कम : रु. २८,०६,०४३.६२/– (रुपये अठ्ठावीस लाख सहा हजार त्रेचाळीस आणि पैसे बासष्ट मात्र) ०९.१०.२०२४ दिनांकित मागणी सूचनेच्या तारखेपासून पुढील व्याजासोबत

प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : कुळगाव बदलापूर महापालिकेच्या मर्यादेमध्ये गाव कुळगाव, तालुका अंबरनाथ, जिल्हा – ठाणे येथे स्थित आणि असलेल्या मोजमापित ६२०० चौ. मीटर्सच्या सर्व्हे क्र. ५७, हिस्सा क्र.–१ (भा.) आणि मोजमापित ४५०० चौ. मीटर्सच्या सर्व्हे क्र. ५७, हिस्सा क्र.–१ (भा.) धारक मालमत्तेवर बांधलेल्या श्री कृष्णा हाइट्स म्हणून ज्ञात इमारतीमधील ''बी'' विंगमधील मोजमापित ६५.२० चौ. मीटर्सच्या (ज्यामध्ये बाल्कनीचे क्षेत्रफळ समाविष्ट आहे), तळमजल्यावरील फ्लॅट क्र. ००२ धारक फ्लॅटचे सर्व अंगीकृत भाग.

३. कर्जदार, सहकर्जदार, हमीदारांचे नाव आणि पत्ता आणि कर्ज रक्कम :
संदीप पांडुरंग खांबे (कर्जदार) आणि निशा संदीप खांबे – (कर्जदार)
फ्लॅट क्र. २०६, दुसरा मजला, बी–विंग, डॅफोडिल बिल्डिंग, अभिषेक प्लोराइड, हजारेनगर, कर्जत, नेरळ–४१० १०१.
एलएएन क्र. : एलकेवायएनएसटीएच००००००८७३३९, **कर्ज करार दिनांक :** २३ मार्च २०२१
कर्ज रक्कम : रु. १६,५०,८००/– (रुपये सोळा लाख पन्नास हजार आठशे मात्र)
एनपीए दिनांक : ०४–१०–२०२४ **मागणी सूचनेची तारीख :** ०९.१०.२०२४
देय रक्कम : रु. १४,४८,०४५.४८/– (रुपये चौदा लाख अठ्ठेचाळीस हजार पंचेचाळीस आणि पैसे अठ्ठेचाळीस मात्र) ०९.१०.२०२४ दिनांकित मागणी सूचनेच्या तारखेपासून पुढील व्याजासोबत

प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : महसूल गाव बोपेले, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या सरासरी मोजमापित ५०० चौ. मीटर्स क्षेत्रफळाच्या सर्व्हे क्र. २९/४/१, प्लॉट क्र. १ आणि सरासरी मोजमापित ३५० चौ. मीटर्स क्षेत्रफळाच्या सर्व्हे क्र. २९/४/ए/२, प्लॉट क्र. २ धारक मालमत्ता, मोजमापित क्षेत्रफळ २२.९८ चौ. मीटर्स, स्वतंत्र बाल्कनी ४.९५ चौ. मीटर्स अधिक १.२९ कपाटाचे क्षेत्रफळ, ''श्री पूजा'' नावाच्या इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील क्र. ४०४ धारक फ्लॅटचे सर्व अंगीकृत भाग.

म्हणून तुम्ही उपरोक्त कर्जदारांना येथे उपरोक्त नमूद धकीत देणे या सूचनेच्या ६० दिवसांत संपूर्ण अदा करण्यासाठी बोलविण्यात येत आहे, कसूर केल्यास निम्नस्वाक्षरीकाराला सरफेसी कायद्याच्या अंतर्गत उपरोक्त नमूद प्रतिभूतींवर अंमलबजावणी करणे भाग पडेल. सदर कायद्याच्या सेक्शन १३ (१३) अंतर्गत, आमच्या संमतीविना तुम्हाला विक्री किंवा अन्य मार्गांना उपरोक्त–संदर्भच्या प्रतिभूतींच्या हस्तांरणापासून निर्बंधित करण्यात येत आहे, याचीही नोंद घ्या.

स्थळ : मुंबई
दिनांक : २८.१०.२०२४
हस्ता./– प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेडकरिता (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

निडो होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : टॉवर ३, पाचवा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई–४०० ०७०

ई–लिलाव – वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई–लिलावाद्वारे विक्री.
सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर''** व **''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार, हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तीचा प्रत्यक्ष ताबा आहे.

कर्जदार/सहकर्जदार/हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
अजय हतनोरे (कर्जदार), सुनीता अजय हतनोरे (सहकर्जदार)	२६.१०.२०२४ रोजीनुसार एलएएन नं. एलएमयूएम एसटीएच००००००३६४९२ अंतर्गत रु. १७,२०,२१५.८९ (रु. सतरा लाख वीस हजार दोनशे पंधरा व एकोणनव्वद पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च	रु. १९,०४,१००/– (रु. एकोणवीस लाख चार हजार शंभर मात्र) इसारा ठेव रक्कम : रु. १,९०,४१०/– (रु. एक लाख नव्वद हजार चारशे दहा मात्र)	१३.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० वा. (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)
परीक्षणाचा दिनांक व वेळ : दि. १५.११.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००		प्रत्यक्ष ताबा दिनांक : दि. २५.०९.२०२४	

प्रतिभूत संपत्तीचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. २०१६, दुसरा मजला, क्षेत्र मोजमापित ४१२ चौ. फूट (चटई क्षेत्रफळ), ''डी–इमारत'', इमारतीचे नाव देव, फेज–४ मधील, करमनगरी नावाने ज्ञात प्रोजेक्टमधील, सर्व्हे क्र. ७०/१ व ७१ धारक जमिनीच्या भूखंडावर निर्मित, पिंपरी गाव, पिंपरी ग्रामपंचायत हद्दीतील व नोंदणीकरण जिल्हा उपजिल्हा ठाणे येथील.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई–मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई–लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड,
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी – ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : **१२.१२.२०२४.**
**४.